# भारताचे दुहेरी सुवर्णयश

## खो-खो वर्ल्ड कपमध्ये महिला आणि पुरुष गटात सरशी



खो-खो वर्ल्ड कपमधील पुरुष गटाचे जेतेपद पटकावणारा भारतीय संघ.



खो-खो वर्ल्ड कपमधील महिला गटाचे जेतेपद पटकावणारा भारतीय संघ.

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

भारतीय पुरुष आणि महिला संघाने अपेक्षेप्रमाणे पहिल्यावहिल्या खो-खो वर्ल्ड कपचे विजेतेपद पटकावले.

इंदिरा गांधी बंदिस्त स्टेडियममध्ये ही स्पर्धा झाली. महिलांच्या अंतिम लढतीत कर्णधार प्रियांका इंगळे, रेश्मा राठोड यांच्या सुरेख कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने नेपाळचा ७८-४० असा पराभव केला. 'नेपाळसारख्या पहाडी प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळताना दबाव मोठा होता; पण आम्ही एक संघ म्हणून उभे राहिलो आणि प्रत्येक क्षणी एकमेकांना पाठिंबा दिला. हा आमचा सांघिक विजय आहे,' अशा शब्दांत कर्णधार प्रियांका इंगळेने आपली भावना व्यक्त केली.

विजयानंतर कर्णधार प्रियांका इंगळे म्हणाली, 'हे केवळ आमच्या संघाचा विजय नसून, तो प्रत्येक भारतीय महिलांच्या स्वप्नांचा विजय आहे. या यशासाठ आम्ही अनेक महिने कष्ट घेतले. त्या मेहनतीचे फळ आज मिळाले आहे. प्रत्येकीने शंभर टक्के योगदान दिले. ही तर सुरुवात आहे. भारतीय महिला प्रत्येक आंतरराष्ट्रीय मंचावर चमकणार, याची खात्री आहे. हे जेतेपद प्रत्येक भारतीयासाठी समर्पित आहे.'

पुरुष गटाच्या अंतिम लढतीत भारतीय संघाने नेपाळचा ५४-३६ असा १८ गुणांनी पराभव केला. यशात सुयश गरगटे, मेहूल यांनी मोलाचा वाटा उचलला. 'नेपाळने आमच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, आम्ही नैसर्गिक खेळ करून विजय खेचून आणला,' असे भारतीय संघाचा कर्णधार प्रतीक वाईकरने विजयानंतर सांगितले.

प्रतीक म्हणाला, 'हे यश आमच्या मेहनतीचे प्रतीक आहे. संपूर्ण देशासाठी हा एक सुवर्णक्षण आहे. भविष्यातही आम्ही अशीच कामगिरी करीत राहू.'